**नि.दि.दा.क्र. ४१०/२०१८**
**( विठ्ठल भोसेकर वि. बबन भोसेकर)**

**निशाणी ३० वरील आदेश**
(दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी पारित)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्या मध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, प्रतीवादी विरुध्द दावा वाटप व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुत दाव्यात दावा प्रलंबित असताना दिनांक ०५/१०/२०१८ रोजी प्रतिवादी यांनी दिनांक २१/०५/१९९२ रोजीचे बोगस व बेकायदेशीर वाटणीपत्र दाखल केलेले आहे. सदर वाटणीपत्राची माहिती वादींना दावा दाखल करणेपुर्वी नव्हती. सदर वाटणी पत्राची माहिती प्रथम दिनांक ०५/१०/२०१८ रोजी वादींना झाली. वाटणीपत्रावर वादींनी केंव्हाही सहया केल्या नव्हत्या. वाटणीपत्रानुसार कै. गेनबा भोसेकर व गणपत भोसेकर यांच्यात वाटप झालेले नाही. अश्या परिस्थितीत वाटणीपत्राचे अनुषंगाने दाव्यामध्ये अनुतोष मागण्यासाठी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादींना दाव्यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रस्तावित परिच्छेद ७अ, ११ई व १० मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने वादींनी दाव्यामध्ये परिच्छेद क्र. ७अ, ११ई व १० अन्वये प्रस्तावित दुरूस्ती अर्जात नमुद केली आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार नाही, किंवा प्रतिवादीचे काही नुकसान होणार नाही असे नमूद केले आहे. तरी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

४. प्रस्तूतच्या अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी नि. ३८ वर म्हणणे देवून अर्ज मंजूर करणेस आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, सदर अर्ज दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. प्रस्तुतचा अर्ज अर्धवट स्वरूपाचा आहे. वादींनी दाव्यामध्ये संपूर्ण मालमत्ता समाविष्ठ केल्या नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज अपुर्ण राहणार आहे. वादींनी संपूर्ण मालमत्ता अर्जात समाविष्ट केली नसल्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा. दुरूस्ती अर्जात कोणतेही तथ्य नाही. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचा मूळ स्वरूपात बदल होत आहे. म्हणून सदरचा अर्ज नामंजुर करावा.

५. अर्जदाराच्या वकीलांचा यूक्तीवाद ऐकला. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की दावा मिळकतीचे वाटप पुर्वीच झालेले आहे. अर्ज अपुर्ण आहे. वाटपा प्रमाणे सर्वजण ताब्यात आहते. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होत आहे म्हणून अर्ज ना मंजूर करावा.

६. प्रस्तूत अर्जाचे व दाव्याचे अवलोकन केले असता अर्जदार प्रस्तावित दुरूस्ती अन्वये त्याला दावा प्रलंबित काळात प्रतिवादीने कैफियत दाखल केल्यानंतर माहित झालेल्या वाटणी पत्रा विषयी अनुतोष मागू इच्छितो आहे. त्या अनुषंगाने तो दाव्यामध्ये दुरूस्ती करू इच्छितो आहे. प्रतिवादींनी दाखल केलेले वाटणी पत्र नोंदणीकृत नाही. दावा दाखल करणेपुर्वी सदर वाटणीपत्राबाबत वादींना माहिती होती याबाबत कोणताही सकृत दर्शनी पुरावा दाव्याचे अभिलेखास आलेला नाही. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत नाही. वादीने प्रस्तावित दुरुस्ती अन्वये कोणतीही कबुली काढून घेतलेली नाही.

७. प्रस्तावित दुरुस्ती केल्यामुळे प्रतिवादींना अडचणीचे ठरत नाही. प्रतिवादींच्या बचावास कोणतीही बाधा येत नाही. प्रस्तावित दावा दुरूस्तीमुळे प्रतिवादींना काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाहीत. दाव्यातील वाद मुद्दे निश्चित झालेले नाहीत. दाव्यामध्ये पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख—या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते. दाव्याचा निर्णय गुणवत्तेवर होणे आवश्यक आहे. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारीत करीत आहेः—

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारास अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. अर्जदाराने दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करून घ्यावी.

दौंड.
दिनांक : २८/०८/२०१९

(एन. बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, कोर्ट क्र.१.